**<u>सं.फौ.ख.क्रं. ६२/२०२३</u>** **<u>निशाणी क्र. ०५ पुढे</u>**

**<u>शासन .वि. आतिष ताकसांडे</u>**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रं.०२ ची शपथेवर जबानी**

.......

**माझे नांव** – शेखर दयारामजी पाटील

**वय** – ६० वर्षे, धंदा – सेवानिवृत्त,

**राहणार** – पिंपरी मेघे, तालुका व जि. वर्धा.

.......

**<u>सरतपासणी – अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता व्ही.एम.गजभिये मॅडम यांच्यामार्फत</u>**

१. दिनांक २५/०८/२०२२ पोलीस स्टेशन दहेगांव येथे पोलीस हवालदार म्हणून या पदावर कार्यरत होतो. पोलीस स्टेशन मध्ये हजर असतांना मुखबीरकडुन खबर मिळाली की, पोस्ट हद्दीत जुनोना येथे आतिष ताकसांडे हा आपल्या घरी गावठी मोहा दारुची विक्री करत आहे. अश्या माहितीवरुन आम्ही व स्टाफ तसेच पंचसह घटनास्थळी गेलो. घटनास्थळी आतिष ताकसांडे यांना घराच्या बाहेर बोलावुन घरझडतीबाबत त्याला माहिती दिली. त्यावरुन त्याची घर झडती घेतली असता त्याच्या घरामध्ये एका प्लास्टीक डबकीत १० लिटर गावठी मोहा दारु मिळुन आली. पंचासमक्ष सदरील दारु जप्त करुन त्यातील १८० एम.एल.च्या बॉटलमध्ये सि.ए.सॅपलकरिता पंचासमक्ष सिल करुन त्यावर मी व पंचाच्या सहीचे कागदी लेबल लावले. त्यानंतर पंचनामा तयार केला. आता मला सदरचा पंचनामा दाखविण्यात आला, तो निशाणी क्र.६ वर आहे. उर्वरित दारु ही पंचासमक्ष नाश केली. सदरील सँपल हा पोलीस स्टेशनला आणुन मोहरर कडे जमा केला. आता मला मुद्देमाल पावती दाखविण्यात आली. त्यावर माझी व पोस्ट मोहरर यांची सही आहे. त्याला निशाणी क्र.७ देण्यात येते. आज रोजी आरोपी हा न्यायालयात हजर आहे.

**<u>सरतपास संपला</u>**

**<u>उलटतपास : आरोपीतर्फे विधीज्ञ बी.डब्लू.चौधरी यांच्या मार्फत:</u>**

२. आरोपी जुनोना येथे राहत असल्याबाबत कोणतेही कागदपत्र दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचे जुनोना येथे घर आहे. जुनोनाला जाण्यापुर्वी पंचांना नोटिस दिली होती पण ती दाखल केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, पंच हे नेहमीचे पंच आहे. हे

म्हणणे खरे नाही की, कोणतीही प्रकारची दारु हे आरोपीच्या घरामधुन जप्त केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती पंचनामा हा पोलीस स्टेशनला बसुन तयार केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

SHAILESH RAJENDRA SATBHAI

Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2025.12.19 17:48:09 +0530

(एस. आर. सातभाई)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सेलू,
जिल्हा–वर्धा.

**दिनांक** : १९/१२/२०२५